# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६/ कार्तिक, २६ १९३८ शके

**१८१.** लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-

(1) महाराष्ट्र विधानसभेच्या सोमवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०१६ पासून विधानभवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या सन २०१६ च्या चतुर्थ अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना online पध्दतीने दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजीपासून सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत तसेच offline व्दारे प्राप्त होणाऱ्या लक्षवेधी सूचना सकाळी ११.०० ते सायं.५.०० वाजेपर्यंत आवक कक्षात स्वीकारण्यात येतील .

(2) एकाच वेळी काही सदस्यांकडून online व काही सदस्यांकडून offline पध्दतीने लक्षवेधी सूचना सादर करण्यात आल्या तरी online लक्षवेधी सूचनांना प्राधान्य देऊन त्यांची संगणक प्रणालीवर नोदणी झाल्यानंतरच offline व्दारे प्राप्त होणाऱ्या लक्षवेधी सूचनांची नोंदणी करण्यात येईल.

(3) लक्षवेधी सूचना online पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने सद्यस्थितीत प्रथम दिवशी अवलंबविण्यात येत असलेली बॅलट पध्दत यापुढे बंद करण्यात येत असून विधानसभेच्या अधिवेशनासाठी लक्षवेधी सूचना सादर करण्याच्या पहिल्या दिवशी सूचना देण्याच्या विहित वेळेवर, विधानभवन, नागपूर येथे येणारे सन्माननीय सदस्य, तसेच त्यांचे स्वीय सहायक हे ज्या क्रमाने विधान भवन इमारतीच्या मुख्य प्रवेशव्दारापाशी हजर होतील, त्याच क्रमाने त्यांनी तेथे नियुक्त असलेल्या या सचिवालयाच्या सुरक्षा अधिकाऱ्यांकडून टोकन क्रमांक घ्यावेत व हे टोकन क्रमांक त्यांनी सादर करावयाच्या लक्षवेधी सूचनांसमवेत या सचिवालयाच्या आवक-टपाल कक्षातील कर्मचाऱ्याकडे सादर करावेत.

(4) महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप जास्तीत जास्त १५० ते १७५ शब्दांचे असावे.

(5) offline पध्दतीने लक्षवेधी सूचना देताना सदस्यांनी त्या आपल्या लेटरहेडवर ३ प्रतीत सादर कराव्यात offline लक्षवेधी सूचनेवर एकापेक्षा जास्त सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील तर कृपया स्वाक्षरीच्या खाली सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करावा.

(6) offline लक्षवेधी सूचना ह्या सदस्य किंवा सदस्यांचे अधिकृत स्वीय सहायक अथवा संबधित विधिमंडळ पक्ष कार्यालयातील अधिकृत ओळखपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांकडून स्वीकारण्यात

२/-

येतील. अन्य खाजगी व्यक्तीमार्फत सदस्यांनी पाठविलेल्या सूचना तसेच सन्माननीय सदस्यांच्या लेटरहेड व्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरूपातील लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात येणार नाहीत व विचारात देखील घेतल्या जाणार नाहीत याची कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घेऊन आवश्यक ते सहकार्य करावे.

(7) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण **३ दिवस** अगोदरचा दिवस हा या सूचना स्वीकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

(8) लक्षवेधी सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेणेसंबंधीचा पूर्ण अधिकार हा मा. अध्यक्षांचाच राहील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१६.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत:-**

1. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
2. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
3. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
4. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
5. मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
6. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
7. मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
8. संगणक कक्ष (website).